# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २९७ वा मंगळवार दि.०७ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB · Racold · legrand · HAVELLS · Finolex · KOLORS · USHA · PHILIPS · SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# लातूर लोकसभा मतदारसंघात आज मतदान

## २ हजार १२५ केंद्रांवर पथके रवाना; सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत मतदान











लातूर :- भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर लोकसभा मतदारसंघात मंगळवारी, (दि. ७) सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. २ हजार १२५ केंद्रांवर होणाऱ्या या मतदान प्रक्रियेसाठी मतदान पथके रवाना झाली. मतदान केंद्रावर नियुक्त मतदान पथकांशी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच मनावर कोणतेही दडपण न घेता आपल्यावर सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, अशा सूचना केल्या जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः संवाद साधल्याने आपल्या मनावरील दडपण कमी झाले असून आता अधिक उत्साहाने मतदान कर्तव्य पार पाडणार असल्याचे यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी सांगितले. पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन येथे लातूर ग्रामीण मतदारसंघ क्षेत्रातील मतदान पथकांना मतदान साहित्य वाटपाच्या कामकाजाची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली. तसेच यासाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून त्यांच्या कामाची माहिती जाणून घेतली. याठिकाणी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याशीही त्यांनी संवाद साधला. सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रियांका आयरे, तहसीलदार मंजुषा भगत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील मतदान साहित्य वाटप शासकीय महिला निवासी तंत्र निकेतन येथे करण्यात आले. याठिकाणी सुरु असलेल्या कामकाजाची पाहणी करून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी मतदान पथकातील अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनीही याठिकाणी भेट देवून कामकाजाची माहिती घेतली. सर्व मतदान पथके मतदान केंद्रांवर रवाना झाली. लातूर लोकसभा मतदारसंघात २८ उमेदवार निवडणूक लढवीत असून एकूण १९ लाख ७७ हजार ४२ इतके मतदार आहेत. २ हजार १२५ केंद्रांवर नियुक्त मतदान पथकांमध्ये ८ हजार ५०० अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ७ मे रोजी होणाऱ्या मतदानादिवशी पहाटे साडेपाच वाजता सर्व उमेदवारांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मॉक पोलची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर सकाळी ७ वाजता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होईल.

उष्णतेच्या लाटेपासून बचावासाठी विशेष खबरदारी

उष्णतेच्या लाटेची शक्यता लक्षात घेवून मतदान केंद्रांवर विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक मतदान केंद्रांवर पिण्यासाठी पाणी, मतदारांच्या रांगेच्या ठिकाणी मंडप, मतदान केंद्रावर उपलब्ध असलेल्या खोलीमध्ये मतदारांना बसण्यासाठी खुर्च्या, पंख्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. आरोग्य विभागामार्फत सर्व मतदान केंद्रांवर विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मतदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रथमोपचार कीटसह आरोग्य कर्मचारी प्रत्येक मतदान केंद्रावर उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याकडे मुबलक प्रमाणात ओआरएस पावडर आणि औषधी उपलब्ध राहतील. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालये यांच्या कार्यक्षेतत्रात रुग्णवाहीकेद्वारे आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून १२ कागदपत्रे ग्राह्य धरणार

मतदाराच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदान ओळखपत्राशिवाय आणखी १२ कागदपत्रे ग्राह्य धरण्याच्या सूचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. यामध्ये आधारकार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक अथवा पोस्ट ऑफीसने जारी केलेले छायाचित्रासह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र अथवा राज्य सरकार किंवा सार्वजनिक उपक्रम अथवा पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदारांना अथवा आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र आदी कागदपत्रांचा समावेश आहे. यापैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत घेवून आल्यास मतदान करता येणार आहे. मात्र, यासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे.

# जागतिक परिचारीका दिनानिमित्त परिचारीका सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिर





लातूर :- जगभरात दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. यानिमित्त ६ मे १२ हे याकाळात परिचारीका सप्ताहानिमित्त परिचारीकासाठी विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.विलासराव देशमुख शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातही आज, महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना,शाखा लातूर संचलित - उत्सव समितीच्या वतीने परिचारीका सप्ताहाचे उद्घाटन सकाळी मुख्य अधिसेविका, श्रीमती अमृता पोहरे व सहाय्यक अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे यांच्या हस्ते व संघटना व उत्सव समितीचे पदाधिकारी व सभासदांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांनंतर ५० वर्षांवरील वयोगटासाठी मिनी मॅरेथॉन व इतरांसाठी धावणे, संगीत खुर्ची बॅडमिंटन, कॅरम, चेस इत्यादी क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत सर्व वयोगटातील परिचारीकांनी सहभाग घेतला. दुपारनंतर महीला व पुरुष परिचारीकांसाठी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते . या शिबिरात आज २० रक्त बॅगांचे संकलन करण्यात आले. पुढे १२ तारखेपर्यंत परिचारीका रक्तदान करणार आहेत.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्या राज्य सरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे, शाखा लातूरच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण, उपाध्यक्ष संजीव लहाने, कार्याध्यक्ष दिपक सोळंके, संघटक व राज्य कार्यकारिणी सदस्य श्री पांडुरंग गव्हाणे, सहखजिनदार दिपक शिंदे, विवेक वागलगावे, संभाजी केंद्रे, सहसचिव भगवान केंद्रे, उत्सव समिती उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, क्रीडा समिती प्रमुख श्रीमती परिमला उबाळे, श्री संतोष पाटील, विविध समिती प्रमुख श्रीमती शारदा खोब्रागडे, श्रीमती रुबिना शेख, श्रीमती सुनंदा चिलगर, श्रीमती शोभा जाधव, श्री योगेश वाघ श्रीमती सुनिता डावकर, श्रीमती कल्पना गायकवाड, श्रीमती पुष्पा जावळे, श्रीमती गुणा बनसोडे, श्रीमती प्रिया गोमारे, श्रीमती अभिशक्ती पवार , ज्योत्स्ना पेरके, रुपाली वाघमारे,श्रीमती राणी जाधव, श्रीमती शलाका मोरे, श्रीमती निशा जाधव, प्राची मुसळे, श्री सतिश करे,श्री किशोर पांचाळ, जगन्नाथ कोरके , श्री भागवत देवकत्ते, बाळू बन श्री शुभम वानखेडे, श्री कृष्णा देवगुडे, सुधाकर केदार, अमित मलिशे, समर्थ कोरे, श्री विक्रांत हुलसुरे इतर पदाधिकारी व सभासद यांनी परिश्रम घेतले.

# बीड भाजपमध्ये एक गट नाराजांचा

बीड : कोणत्याही पक्षात अंतर्गत गटबाजी असते. अशीच भाजपमध्येही आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत सक्रिय असणारे पदाधिकारी, कार्यकर्ते सध्या पंकजा मुंडे यांच्यापासून दुरावत चालले आहेत. जिल्हा नेतृत्त्वाकडून मान, सन्मान आणि संवाद साधला जात नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. भाजपमध्ये असूनही माजी जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे, बीड तालुकाध्यक्ष स्वप्नील गलधर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा हा नाराज गट लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारात सक्रिय नसल्याचे दिसते.पंकजा मुंडे त्यांचा पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी संवाद दुरावत गेला. २०१९ साली त्यांचा परळी मतदारसंघातून विधानसभेत पराभव झाला. त्यानंतर त्या फारशा सक्रिय नव्हत्या.पदाधिकारी, कार्यकर्त्यांना भेटतही नव्हत्या. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होत गेले. आज गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत असणारे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते हे भाजपमध्ये अजुनही पंकजा मुंडे यांचा प्रचार करण्यासाठी समोर येताना दिसत नाहीत. याची जाणीव पंकजा मुंडे यांना आहे. कारण २४ एप्रिल रोजी अर्ज दाखल केल्यावर झालेल्या जाहीर सभेत पंकजा यांनी बोलूनही दाखवले होते.

# कन्हेरी सज्जाचे तलाठी दत्ता शिंदे यांना मातृशोक



लातूर :- लातूर तहसील कार्यालयातील कन्हेरी सज्जाचे तलाठी दत्ता शिंदे यांच्या मातोश्री सौ महानंदा रुक्माजी शिंदे हे तीन ते चार वर्षापासून आजारी होत्या रविवारी दि ५ मे २०२४ रोजी दुपारी २:३० वाजता पटेल नगर येथील राहत्या घरी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते.त्यांच्या पश्चात पती रुक्माजी शिंदे, दोन मुले दत्ता शिंदे, सचिन शिंदे, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. सौ महानंदा रूक्माजी शिंदे यांचा अंत्यविधी मारवाडी शमशान भूमी लातूर येथे सोमवारी दि ६ मे२०२४ रोजी सकाळी ९:०० वाजता झाला आहे. सौ महानंदा शिंदे यांच्या दुःखद निधनामुळे पटेल नगर व लातूर तहसील कार्यालयात शोककळा पसरली आहे. त्यांच्या या दुःखद निधनामुळे शिंदे परिवारावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याकरिता ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहेत. दैनिक महावृत्त परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

# देव, देश आणि धर्म ही त्रिसूत्री जपण्यासाठी महायुतीला साथ द्या आ. संभाजी पाटील निलंगेकर



लातूर/प्रतिनिधी : देव, देश आणि धर्म ही त्रिसूत्री डोळ्यासमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाची गती कायम ठेवली आहे. देशातील सामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेत २०४७ पर्यंत भारताला विकसित करण्याच्या दृष्टीने देशाची वाटचाल सुरू आहे. राष्ट्रीय हितासाठी ही निवडणूक होत आहे त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला साथ देण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी म्हणून लातूर मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना विजयी करा, असे आवाहन लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे. लातूर लोकसभेसाठी मंगळवार दि. ७ मे रोजी मतदान प्रक्रीया पार पडत आहे. यासाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, महायुतीने खा. सुधाकर शृंगारे यांना उमेदवारी दिली आहे. मागील महिनाभरापासून उमेदवार खा. शृंगारे यांनी मतदारांच्या गाठी-भेटी घेवून दहा वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारने आणि मागील पाच वर्षात त्यांनी स्वतः केलेल्या विकास कामांची माहिती नागरिकांना देत पुन्हा एकदा आशीर्वाद देण्याचे आवाहन केले आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी आ. निलंगेकर म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून निवडणूक म्हणजे लोकशाहीतील उत्सव आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराने या उत्सवात सहभागी होत मतदान करणे आवश्यक आहे. देशाचा अभिमान वाढविण्यासाठी ही निवडणूक आवश्यक असून देश व संविधान वाचविण्यासाठी प्रत्येक मतदारांचा त्यातील सहभाग क्रमप्राप्त आहे. प्रत्येक मतदाराने मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये याची काळजी घ्यावी. देशाचे खंबीर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती पुन्हा एकदा नेतृत्व सोपविण्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे. त्यामुळे प्रत्येकाने मतदान करून लोकशाही अधिक सुदृढ करावी, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले आहे. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व राज्यातील महायुती सरकारने सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. लातूर मतदारसंघासाठी रेल्वे बोगी कारखाना, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, महामार्गांचे जाळे तयार करत विकासाला गती दिली आहे. लातूरचा पाणीप्रश्न सोडविण्याची ताकद आणि इच्छाशक्ती केवळ भाजपा व महायुतीमध्येच आहे. लातूरला विकसित भारताचे केंद्र बनविण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले असून आता त्यांचे लातूरच्या विकासाकडे थेट लक्ष राहणार आहे. भविष्यात लातूरला उद्योगनगरी म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी मतदारांनी पुन्हा एकदा भाजपा महायुतीच्या पारड्यात आपले मत टाकावे, असेही आ. निलंगेकर म्हणाले. आपले मत राष्ट्रहितासाठी, आपले मत देशहितासाठी, आपले मत सुरक्षित भारतासाठी, आपले मत सामान्य नागरिकांच्या उज्वल भविष्यासाठी, आपले मत विकसित भारतासाठी अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे लातूर लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा. लातूर मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या नावासमोरील कमळ या चिन्हाचे बटन दाबून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे. देशाचे खंबीर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ देण्यासाठी त्यांना पुन्हा एकदा लोकसभेत पाठवावे, असे आवाहनही आ. निलंगेकर यांनी केले आहे.

## संपादकीय....

# पण वादग्रस्त झालेले पद

भारताच्या घटनात्मक इतिहासात आतापर्यंत सर्वाधिक वादग्रस्त ठरलेले घटनात्मक पद म्हणजे राज्यांचे राज्यपालपद होय. विशेषतः राज्यात आणि केंद्रात वेगळ्या विचारांचे सरकार असताना हे पद जास्त वादग्रस्त ठरले आहे. वास्तविक, राज्यपालपदाची निर्मिती ही राज्याचे घटनात्मक आणि प्रशासकीय प्रमुख म्हणून झाली आहे. राज्यपाल एक प्रकारे केंद्राचे प्रतिनिधीदेखील असतात.

देशाच्या पातळीवर राष्ट्रपतींच्या पदाला जे महत्त्व आणि अधिकार आहेत, कमी-अधिक प्रमाणात त्या सर्व बाबी राज्यपालांना लागू होतात. राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपतींद्वारे केली जाते आणि राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत अथवा पदाची पाच वर्षे पूर्ण होईपर्यंत अथवा पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतरही नवीन व्यक्ती राज्यपाल पदाची जबाबदारी स्वीकारेपर्यंत राज्यपाल त्या पदावर राहतात.राज्यपालपदासाठी घटनेमध्ये संबंधित व्यक्ती देशाची नागरिक असणे आणि त्या व्यक्तीने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असणे, या दोनच अर्हता नमूद आहेत. या व्यतिरिक्त या पदासाठी कोणत्याही अर्हतेच्या अटी घटनेत नमूद नाहीत.इतिहास पाहता केंद्राच्या सत्ताधारी पक्षातील सक्रिय राजकारणातून निवृत्त झालेल्या व्यक्तींची या पदी नियुक्ती करण्याची एक प्रथा पडली आहे. राज्यपालांनी नियुक्तीच्या वेळी कोणत्याही राज्य विधिमंडळ अथवा संसदेच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य असणे अपेक्षित नाही.तसे असल्यास ज्यावेळी संबंधित व्यक्ती राज्यपालपदाची शपथ घेईल, त्याचवेळी आधीचे पद आपोआप संपुष्टात आले, असे ग्राह्य धरण्यात येईल. राज्यपालांना संपूर्ण देशभरात कोणतेही लाभाचे पद स्वीकारता येत नाही. त्यांना सरकारी निवासस्थान व संसद वेळोवेळी ठरवून देईल, अशा सर्व सुविधा अनुज्ञेय आहेत. सध्या राज्यपालांना प्रतिमाह साडेतीन लाख इतके वेतन दिले जाते. राज्यपालांना अपवादात्मक परिस्थिती वगळता मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच काम करावे लागते, राज्यपाल विधिमंडळाचे अधिवेशन बोलावू आणि समाप्त करू शकतात.विधिमंडळाच्या सभागृहाला संदेश पाठवू शकतात, प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला राज्यपाल विधिमंडळाच्या सभागृहांना संबोधित करतात. विधिमंडळाने संमत केलेले कोणतेही विधेयक राज्यपाल हे पुन्हा विधिमंडळास पुनर्विचारासाठी पाठवू शकतात; अथवा थेट राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात.विधिमंडळातील अध्यक्ष, उपाध्यक्षांची पदे रिक्त असल्यास राज्यपाल विधिमंडळाचे कामकाज पाहण्यासाठी सभागृहातील कोणत्याही एका सदस्यांची नेमणूक करू शकतात, ज्या राज्यांत विधान परिषद सभागृह आहे, त्या राज्यात राज्यपाल नियुक्त आमदारांची नियुक्ती ते करतात. तसेच इतर घटनात्मक पदे जसे की राज्य लोकसेवा आयोग,राज्य निवडणूक अधिकारी, वित्त आयोग या सर्वांच्या प्रमुखांची नियुक्ती देखील राज्यपाल हे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतात. राज्याचा संपूर्ण कारभार हा राज्यपालांच्या नावानेच चालवला जातो. महाधिवक्त्यांची नियुक्तीदेखील राज्यपालांद्वारे केली जाते.

राज्यातील घटनात्मक यंत्रणा अपयशी झाल्यास राज्यपाल हे राष्ट्रपती राजवटीची शिफारस करू शकतात, राज्यपालांना भारतीय राज्यघटनेने हा फार मोठा विशेषाधिकार दिला आहे, अशी शिफारस करण्यासाठी राज्यपालांना मंत्रिमंडळाच्या सल्ल्याची कोणतीही आवश्यकता नसते. केवळ राज्यपालांचे समाधान पुरेसे आहे.तसेच कोणत्याही एका पक्षाला बहुमत नसल्यास मुख्यमंत्री पदाची शपथ कोणाला द्यायची, हाही राज्यपालांचा विशेषाधिकार आहे. राज्यातील अर्थविधेयक हे राज्यपालांच्या संमतीनेच सभागृहासमोर सादर होते. ज्या राज्यांत विधान परिषद सभागृह आहे,त्या राज्यांच्या बाबतीत एक षष्ठांश सदस्यांची नियुक्ती थेट राज्यपालांद्वारे केली जाते. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकीप्रसंगी देखील संबंधित राज्यांच्या राज्यपालांचा औपचारिक सल्ला घेतला जातो.काही राज्यांच्या राज्यपालांना घटनेद्वारे विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. उदाहरणार्थ महाराष्ट्राच्या राज्यपालांना विदर्भ आणि मराठवाडा यांच्या विकासाकरिता स्वतंत्र विकास मंडळांचा अहवाल सभागृहासमोर ठेवणे,या भागांच्या विकासाकरता निधीचे समन्याय वाटप करणे आणि या भागातील तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पुरेशा सोयी व राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था उभी करणे,असे विशेष अधिकार आहेत. तसेच विशेषाधिकार नागालँड, आसाम, मणिपूर आणि इतरही राज्यांबाबतीत आहेत. गेल्या काही वर्षांत मात्र राज्यपालपद हे केंद्र व राज्य संबंधातील दुवा न राहता हे पद केंद्राच्या राज्यातील कारभारात हस्तक्षेप करण्याचे एक साधन बनले आहे.

# लसीच्या दुष्परिणामांचं भूत

कोव्हिशिल्ड लस बनवणारी कंपनी ॲस्ट्राझेनेकाने ब्रिटिश न्यायालयात दिलेल्या माहितीमध्ये लशीमुळे ब्लड क्लॉटिंग म्हणजेच रक्तात गाठी होण्याची शक्यता असल्याचे मान्य केले. यानंतर एकच गदारोळ निर्माण झाला. ॲस्ट्राझेनेकाच्या या कबुलीजबाबाने जगात दहशत निर्माण झाली आहे. कोरोनापासून बचाव करण्यासाठी ज्यांनी कोव्हिशिल्ड घेतली त्या लोकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. वास्तविक भारतात तिशी-चाळीशीतील व्यक्तींच्या अकाली निधनामुळे हा मुद्दा मध्यंतरीच्या काळात प्रकर्षाने चर्चेत आला होता. लसीचा आणि या मृत्यूंचा संबंध नसल्याचे सरकारकडून स्पष्ट केले गेले; पण ॲस्ट्राझेनेकाच्या खुलाशानंतर याबाबत नव्याने परीक्षण करण्याची गरज निर्माण जाली आहे.

कोरोना लस निर्माण करणा-या ॲस्ट्राझेनिकाने लशीच्या दुष्परिणामावरून न्यायालयात दिलेली कबुली पाहता जगभरात एकच खळबळ उडाली त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात कोरोना काळानंतर अशा काही घटना घडल्या की तंदुरुस्त आणि कमी वयाच्या लोकांना अचानक हृदयविकाराचा झटका येण्यास सुरुवात झाली. मग सांस्कृतिक व्यासपीठ असो, लग्न सोहळा असो, पार्टी असो यादरम्यान मौजमजा करताना अचानक चक्कर येणे आणि त्यानंतर तात्काळ मृत्यू होण्याच्या घटना उघडकीस आल्या. विशेष म्हणजे सुमारे दोन-तीन वर्षांत अशाप्रकारे होणा-या मृत्यूंनी एकप्रकारे गूढ रुप धारण केले आहे. आता ॲस्ट्राझेनेकाच्या कबुलीने तर परिस्थिती आणखीच चिघळली आहे. कंपनीच्या दाव्यानुसार, काही तरुणांना हृदयविकाराचा झटका येणे आणि मृत्यू होणे यासारख्या घटना कोव्हिशिल्डच्या दुष्परिणामामुळे होत आहेत; पण हे सत्य आहे की संभ्रम निर्माण करणारे, हे कोणालाही ठोसपणे सांगता येणार नाही. कोव्हिशिल्ड कंपनीच्या खुलाशानंतर भविष्यात लसधारकांना दुष्परिणामाला सामोरे जावे लागणार, अशी भीती निर्माण झाली आहे. ही लस वापरण्याचा आकडा पाहिला तर भारतात एक अब्ज १७ कोटी डोस देण्यात आले. कोरोनापासून बचाव करण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी कोव्हिशिल्डची लस घेतली असून संपूर्ण जगाचा विचार केला तर ही संख्या ३ अब्जपर्यंत पोहोचू शकते. कोव्हिशिल्ड लस बनवणारी कंपनी ॲस्ट्राझेनेकाने ब्रिटिश न्यायालयात दिलेल्या माहितीमध्ये लशीमुळे ब्लड क्लॉटिंग म्हणजेच रक्तात गाठी होण्याची शक्यता असल्याचे मान्य केले. यानंतर एकच गदारोळ निर्माण झाला. ॲस्ट्राझेनेकाच्या या कबुलीजबाबाने जगात दहशत निर्माण झाली आहे. कोरोनापासून बचाव करण्यासाठी ज्यांनी कोव्हिशिल्ड घेतली त्या लोकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे; परंतु भारतातील लोकांना घाबरण्याची गरज नाही. कारण भारतीय आरोग्य व्यवस्थेने असे दुष्परिणाम आपल्याकडे दिसत नसल्याचे सांगितले आहे. सध्या लस सुरक्षित असून त्याचे दुष्परिणाम दिसून आले तरी आरोग्य यंत्रणा सक्षम आहे, असा दावा आरोग्य यंत्रणेने केला आहे तसेच सरकारकडूनदेखील हीच बाब सांगितली गेली आहे तरीही लोकांच्या मनातील भीती दूर होताना दिसत नाही आणि त्यामुळे वेगवेगळ्या गोष्टी बोलल्या जात आहेत.

कोरोना प्रतिबंधक लशीच्या दुष्परिणामावरून जगात खळबळ उडालेली असताना ॲस्ट्राझेनेकाचे प्रकरण न्यायालयात कसे पोहोचले? हे पाहणेदेखील गरजेचे आहे. ब्रिटिश नागरिक जॅमी स्कॉन यांनी ॲस्ट्राझेनेका कंपनीविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला. त्यांनी एप्रिल २०२१ मध्ये कोव्हिशिल्ड लस घेतल्यानंतर त्यांच्या मेंदूला कायमस्वरुपी इजा झाली. जेम स्कॉटसह अनेक जण थ्रोम्बोसिस नावाच्या दुर्मिळ आजाराने बाधित झाले. त्याच वेळी सर्वांनी एकत्र येऊन कंपनीविरुद्ध न्यायालयात खटला भरला. त्यानंतर न्यायालयात या दिग्गज औषधी कंपनीने लशीमुळे निर्माण होत असलेल्या गंभीर आरोग्य समस्येचा मुद्दा मान्य केला.



न्यायालयाने कंपनीला पीडित लोकांना १० कोटी पौंड दंड भरण्याचा आदेशदेखील दिला. या खुलाशानंतर कोरोनाच्या अन्य लशी फायझर, मॉडर्ना यांच्या बाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या कंपन्या तत्कालिन काळात भारतात सक्रिय होत्या आणि त्यांनाही आपल्या लशीसंदर्भात उत्तर द्यावे लागेल. कारण जागतिक पातळीवर हा मुद्दा संवेदनशील बनला आहे. जेव्हा कोरोनाने जगभरात थैमान घातले होते आणि जग त्याच्या विळख्यात अडकले तेव्हा कोव्हिशिल्ड लशीला ऑक्सफर्ड विद्यापीठाने परवानगी दिली. या लशीला कोव्हिशिल्ड हे नाव भारतानेच दिले आहे आणि ही बाब फार कमी जणांना ठाऊक आहे. ॲस्ट्राझेनेका व्हॅक्सिन जोब्रिया लशीची निर्मिती ही भारतात औषधी कंपनी सीरम इन्स्टिट्युट ऑफ इंडिया म्हणजेच 'एआयआय'ने आपल्या पातळीवर केली. लस झाल्यानंतर त्याची कायदेशीररित्या चाचणी घेण्यात आली. सर्वात अगोदर उंदरांवर प्रयोग केला गेला. त्यानंतर एखाद्या दुस-या गंभीर रुग्णांवर त्याचा प्रयोग केला. त्याचे परिणाम चांगले आले त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता मिळाली. भारतीय शास्त्रज्ञ आणि डॉक्टरांच्या संयुक्त पॅनेलच्या देखरेखीखाली त्याची तपासणी करण्यात आली आणि त्यानंतरच ही लस रुग्णांना देण्यास सुरुवात झाली; परंतु ब्रिटनमध्ये कायद्याचे पालन न करता आणि चाचणी न घेता घाईगडबडीत कोव्हिशिल्डची लस देण्यात सुरुवात झाली होती. हा मुद्दा ब्रिटन सरकारने न्यायालयात मान्य केला आहे त्यामुळे ॲस्ट्राझेनेकाचे म्हणणे न्यायालयात सत्य असल्याचे वाटते. ही लस दुर्मिळ आजार समजला जाणारा टीटीएसला कारणीभूत ठरू शकते, असे म्हटले जात आहे. डॉक्टरांच्या मते, या लशीची दीर्घकाळ चाचणी घेणे गरजेचे होते; परंतु त्यावर लक्ष दिले गेले नाही. त्याची जबाबदारी औषधी कंपनीचीच आहे. या लशीचे दुष्परिणाम हे भविष्यात गंभीर राहू शकतात, हे ठाऊक असतानाही त्यांनी लोकांच्या आयुष्याशी खेळण्याची जोखीम कशी उचलली? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून त्याचे उत्तर ॲस्ट्राझेनेकाला द्यावे लागणार आहेत. भारतीय डॉक्टरांनीदेखील या लशीचे दुष्परिणाम असतील तर क्षणाचाही वेळ न दवडता तातडीने ते परिणाम जनतेसमोर आणण्याचे प्रयत्न करायला हवेत तसेच त्याचा शोध घेऊन उपाय काढायला हवेत, परिणामी मानवाचे समाजातील जीवनमान सुरक्षित राहू शकेल. कोरोनापुढे संपूर्ण जगाने हात टेकले होते तेव्हा सर्वांना आपला जीव वाचवण्यासाठी आटापिटा करावा लागला. ॲस्ट्राझेनेकाने जागतिक भागिदारी कंपनीसह जागतिक पातळीवर ३ अब्ज लशींची निर्मिती केली. सरकारनेदेखील त्यांना ध्येय निश्चित करून दिले होते; परंतु त्यात घाई झाली आणि ही बाब मान्यही केली गेली आहे. त्याच वेळी भारतात सीरम इन्स्टिट्युटने कोव्हिशिल्डची लस युद्धपातळीवर तयार केली आणि ती भारत सरकारला सुपुर्द केली. ॲस्ट्राझेनेकाने ऑक्सफर्डसमवेत काम करीत कोरोना प्रतिबंधक लस तयार केली होती. त्याच वेळी भारतात लस तयार करणारी कंपनी सीरम इन्स्टिटट्युटने ॲस्ट्राझेनेकाशी करार करून कोव्हिशिल्ड तयार केली. यानंतर देशात निम्म्यांपेक्षा अधिक लोकांनी ही लस घेतली मात्र सर्वांवर सारखेच परिणाम दिसत आहेत. अर्थात भारतातील शास्त्रज्ञ आणि डॉक्टर हे अचानक होणा-या मृत्यूला कोरोना लशीचा संबंध असल्याच्या बाजूने नाहीत; परंतु ब्रिटिश न्याालयातील प्रकरणाने तज्ज्ञांना नव्याने विचार करण्यास प्रवृत्त केले आहे. भारतीय डॉक्टरदेखील त्यात संशोधन करीत आहेत. आता ही जबाबदारी सरकारची असून लोकांच्या मनात कोव्हिशिल्डबाबत निर्माण झालेली भीती दूर कशी करता येईल, यासाठी पावले टाकायला हवीत.

# मतटक्का वाढावा !

लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्याचे मतदान पार पडल्यानंतर आज ७ मे रोजी तिस-या टप्प्याचे मतदान होत आहे. या तिस-या टप्प्यातील प्रचाराच्या (की अपप्रचाराच्या?) तोफा रविवारी सायंकाळी ५ वाजता थंडावल्या. देशभरात तिस-या टप्प्यात १२ राज्यांतील ९४ लोकसभा मतदारसंघांत मतदान होणार आहे. तिस-या टप्प्यात १२ राज्यातील १३५१ उमेदवार रिंगणात आहेत. तिस-या टप्प्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, डिंपल यादव, शिवराजसिंह चौहान, सुप्रिया सुळे, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती उदयनराजे भोसले, नारायण राणे, प्रणिती शिंदे, सुनील तटकरे, अनंत गीते, धैर्यशील मोहिते-पाटील, ओमराजे निंबाळकर, सुधाकर शृंगारे यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. तिस-या टप्प्यात गुजरातच्या २६ मतदारसंघांत ६५८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात ११ जागांसाठी ५१९ उमेदवार उभे आहेत. कोकण विभागातील २, पुणे विभागातील ७ तर औरंगाबाद विभागातील २ अशा एकूण ११ मतदारसंघांत मतदान होईल. या ११ मतदारसंघांत रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांचा समावेश आहे. या ११ मतदारसंघांत प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यासह राज्यातील सर्व प्रमुख नेते मैदानात उतरले होते. यात सर्वाधिक चर्चेत राहिलेला मतदारसंघ म्हणजे बारामती. तेथे सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार अशी लढाई आहे. खरे पाहता मुख्य लढत शरद पवार विरुद्ध अजित पवार अशीच आहे. बारामतीचा गड शरद पवार राखणार की अजित पवार विजयी धडक देणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष आहे. ११ मतदारसंघांत २ कोटी ९ लाख ९२ हजार ६१६ मतदार आहेत. राज्यात पहिल्या दोन टप्प्यात मतदानाचा टक्का घसरला होता. आता तिस-या टप्प्यात त्यात सुधारणा होईल, अशी आशा आहे.



पहिल्या दोन टप्प्यांना कडक उष्णतामानाचा फटका बसला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. तसे असेल तर तिस-या टप्प्यालाही हा तडाखा बसणार आहे. कारण सध्या देशातील अनेक राज्यांमध्ये तापमानात कमालीची वाढ झाली आहे. आंध्र प्रदेशात कमाल तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसवर तर महाराष्ट्रातील विदर्भात तो ४४ अंश सेल्सिअसवर गेला आहे. लातूर जिल्ह्यातील औराद शहाजानी येथे पारा ४५ अंश सेल्सिअसवर होता. राज्यात पावसाचा अंदाजही वर्तविण्यात आला आहे. गत चार-पाच दिवसांपासून सूर्यनारायण अक्षरश: कोपला आहे. सकाळपासूनच उन्हाचे चटके बसू लागले आहेत. राज्यातील बहुतेक जिल्ह्यात पारा ४० अंशाच्या वर आहे. गत काही दिवसांपासून थांबलेले अवकाळी पावसाचे संकट पुन्हा येऊ घातले आहे. मतदान टक्का घसरण्यामागचे एकमेव कारण उष्णतामानाचा फटका हेच नाही तर दुसरेही महत्त्वाचे कारण म्हणजे निवडणूक प्रचारातील अपप्रचार! यंदाच्या लोकसभा निवडणुकीचा प्रचार दिशाहीन झाला आहे.

राज्यातील पाणीप्रश्नाची विदारक स्थिती झाली आहे. त्यावर केवळ भाष्यच नव्हे तर तोडगा काढण्यासाठी कोणाही राज्यकर्त्याला सध्या फुरसत नाही त्यामुळे लोकशाहीचा उत्सव साजरा करायचा तर तो नेमका कोणासाठी? हा प्रश्न सर्वसामान्य माणसाला भेडसावत आहे. हवामान बदलाचे संकट वरचेवर अधिकच गहिरे होत चालले आहे. उष्णतामानाचे नवनवे विक्रम प्रस्थापित होत आहेत. देशातील डोंगरराजी, वनसंपत्तीची खुलेआम कत्तल केली जात आहे. जागतिक व्यासपीठावरून पर्यावरणाच्या शपथा घ्यायच्या आणि देशात वृक्षतोडीला मोकळे रान करून द्यायचे, असे दुटप्पी धोरण राज्यकर्त्यांनी अवलंबिले आहे. यामुळे पर्यावरणाचा -हास होत असून राज्यकर्त्यांना त्याचे कोणतेही सोयरसुतक उरलेले नाही. पंतप्रधान मोदींच्या जिथे जिथे सभा झाल्या तिथे किती वृक्ष जिवंत आहेत ते बघावे लागेल. शहरी भागातील धुलीकणाच्या समस्येवर उपाय म्हणून रस्ते पाण्याने धुण्याचा तुघलकी प्रयोग करण्याचे प्रयोजन काय? हा प्रश्न सत्ताधा-यांना विचारावा, असे कोणालाच वाटत नाही. ग्रामीण भागातील नद्या, तलाव बाष्पीकरण होऊन झपाट्याने आटू लागले आहेत. पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत आहे. जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जंगलातील पाणवठे कोरडे पडल्याने वन्य पशू-पक्ष्यांनी आपला मोर्चा लोकवस्त्यांकडे वळविला आहे. भू-जल-वायू प्रदूषणाच्या मूळ मुद्यावर 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असाच पवित्रा राज्यकर्त्यांनी घेतला आहे. तरुणांच्या देशापुढील महागाई, बेरोजगारीचे मुद्दे दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत आहेत. देशातील दारिद्र्य वाढत चालले आहे. गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी अधिकच वाढत चालली आहे. गरिबी हटावपेक्षा गरिबांना हटविण्याचे प्रयोग सुरू आहेत. देशात महिलांवरील वाढत्या अत्याचाराचा मुद्दा ऐरणीवर येऊनसुद्धा त्या विषयी कोणाला काही बोलावेसे वाटत नाही. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात देशात राज्यघटना बदलणार की नाही या मुद्यावरून रणकंदन सुरू आहे. माजी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या कार्यकाळातील चघळून चोथा झालेल्या मुद्यावरून नव्याने चर्चा घडवून आणली जात आहे.

मुस्लिमांना आरक्षण द्यावे की नाही, यावरून समाजमन कलुषित करण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. ज्यांचे बोट धरून राजकारणात आल्याच्या गप्पा मारल्या त्यांच्यावरच आता 'भटकता आत्मा' अशी टीका केली जात आहे. कुणाला किती मुले आहेत यावरून अकारण वाद वाढविण्यात येत आहेत. निवडणूक प्रचाराला कधी जातीय तर कधी धार्मिक रंग देऊन वातावरण चिघळविण्याचे प्रयत्न होत आहेत. पक्ष फोडाफोडी, आमदार फोडाफोडीत राजकीय नेते मशगुल झाले. यातून पक्षात भाऊगर्दी झाली त्यामुळे भाकरी फिरविण्याचे सोडा ती हिसकावून घेण्याचे प्रकार सुरू झाले. पक्ष, आमदार, खासदार फोडून काय मिळविले? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. देशहिताच्या मुद्यावर चर्चा कमी आणि उखाळ्या-पाखाळ्याच अधिक झाल्यानेच मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली असावी तरीही मतटक्का वाढावा, ही अपेक्षा.


# उष्माघातापासून दूर राहण्यासाठी स्वत:मध्ये करा ‘हे’ पाच बदल

आता उन्हाळ्यात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशात शरीराला पाण्याची कमतरता जाणवणे, स्ट्रोक, खूप जास्त घाम येणे, थकवा जाणवणे इत्यादी समस्यांचा त्रास होतो. अशात भरपूर पाणी पिणे, सुती कपडे घालणे आणि नीट योग्य तो पोषक आहार घेणे गरजेचे आहे.इन हाउस आयुर्वेदिक सल्लागार डॉ. अश्विनी कोन्नूर यांनी उन्हापासून संरक्षण करण्यासाठी काही प्रभावी मार्ग सांगितले आहेत.आहाराकडे लक्ष द्या तुम्ही जे काही खाता, त्याचा थेट परिणाम तुमच्या ऊर्जेवर दिसून येतो. उन्हाळ्यात पचायला हलक्या असणाऱ्या अन्नाचा आहारात समावेश करणे कधीही चांगले असते. उष्ण वातावरणात शरीराची पचनक्रिया मंदावते. त्यामुळे शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यासाठी हलका पोषक आहार घ्यावा. उदा. दही, पांढरा भात, सॅल्मन मासा तुम्ही खाऊ शकता. आंबट व तिखट पदार्थ खाणे टाळा. भरपूर फळे आणि भाजीपाला खा फळे आणि भाजीपाल्यामध्ये खूप जास्त प्रमाणात जीवनसत्त्वे, पोटॅशियम, फोलिक ॲसिड व मिनरल्स असतात. हे घटक शारीरिक क्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतात. त्यामध्ये चांगले फॅट्स असतात; जे हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात.उदा.काकडी बेरी टरबूज सायट्रिक ॲसिड समृद्ध फळे ॲव्होकॅडो जास्तीत जास्त द्रव पदार्थांचे सेवन करा उन्हाळ्यात जास्तीत जास्त द्रव पदार्थांचे सेवन करणे खूप गरजेचे आहे. द्रव पदार्थ आपल्या शरीरातील पाण्याची पातळी भरून काढतात आणि आपले शरीर थंड ठेवण्यास मदत करतात. उन्हाळ्यात अल्कोहोल घेणे टाळले पाहिजे. त्याऐवजी फळांचा रस, लिंबू पाणी, ताक, नारळ पाणी, ग्रीन टी हे द्रव पदार्थ सहज उपलब्ध असतात आणि त्याचे अनेक फायदेही दिसून येतात.व्यायामामध्ये बदल करा उन्हाळ्यात शरीरावर ताण पडणार नाही, याची काळजी घ्या आणि त्यानुसार व्यायामप्रकार निवडा. खूप जास्त तास व्यायाम करणे आणि खूप जास्त धावणे टाळा. त्याऐवजी प्राणायाम करा.शीतली प्राणायाम – या प्राणायामामध्ये तोंडावाटे हवा आत घेऊन नाकावाटे सोडली जाते. त्यामुळे शरीराला थंडावा मिळतो. शीतकारी प्राणायाम – या प्राणायामामध्ये तोंडाद्वारे श्वास घेतला जातो. आणि त्यामुळे शरीराला थंडावा मिळतो.सदांता प्राणायाम – या प्राणायामामध्ये दातांद्वारे हवा आत घेऊन नाकावाटे बाहेर सोडली जाते.त्याशिवाय तुम्ही वृक्षासन, अर्धकटी चक्रासन, कोनासन, त्रिकोणासन, मार्जारासन, बद्धकोनासन, वज्रासन, शशांकासन, चक्रासन, नवासन, योग निद्रा इत्यादी आसन प्रकार तुम्ही करू शकता. जीवनशैलीमध्ये बदल करा उन्हाळ्यात रात्र लहान असते. त्यामुळे दिवसा तुम्ही थोडा आराम करू शकता. त्याशिवाय फिकट रंगाचे सुती कपडे, चंदन, फुलांपासून बनविलेले अत्तर यांचा वापर करा. घराबाहेर पडण्यापूर्वी किमान ५० एसपीएफ असलेले सनस्क्रीन वापरा. जर कडाक्याचे ऊन असेल तर सनकोट, तसेच छत्री वा टोपीचा वापर करा.



# नखं खाण्याची सवय महागात पडेल,आत्ताच बंद करा नाहीतर आरोग्याच्या तक्रारींचा येईल महापूर

काही टेन्शन असेल, एखादा इंटरव्ह्युव होणार असेल तर अशावेळी लोक बैचेन असतात. कारण, त्यांच्या मनात भिती, शंका-कुशंका यांनी घर केलेलं असतं. पण, अशावेळी ते एक कृती नेहमी करत असतात. ती म्हणजे नखं खाणे किंवा चावणे होय.मनोसोपचार तज्ज्ञांच्या मते, जेव्हा माणूस तणावात किंवा एखाद्या गुढ विचारात असतो तेव्हा तो नखे चावतो. खरं तर, याची व्यक्तीला सवय लागते. मग अगदी थोडं जरी टेंन्शन आलं किंवा विचारात मग्न असलं तर नखं खायची सवय लागून जाते. पण ही सवय अशा लोकांच्या आरोग्यावर परिणाम करणारी ठरू शकते. कारण, सतत नखे चावणे तुम्हाला आजारी पाडू शकते. आपण प्रत्येक गोष्ट आपल्या हातांनी करतो. तेव्हा नखांमध्ये घाण साचते. त्या घाणीत बॅक्टेरिया निर्माण होतात. जे नखे चावल्याने नखांवाटे तोंडात जातात. त्यामुळे सतत नखे कापणे आणि हात धुण्याचा सल्ला डॉक्टर देतात.लहान मुलं तर हाताची बोटे चोखत असतात. त्यांचे हात आणि नखांमध्ये घाण साचते. ती पोटात जासे त्यामुळे मुलांना जुलाब, पोट दुखी असे आजार होतात. नखं खाल्ल्याने काय होते?सतत नखे चावत राहिल्याने शरीर अनेक रोगांचे घर बनू शकते. यामुळे, त्वचेला संसर्ग होण्याची शक्यता असते. ज्यामुळे तुमचे शरीर अनेक धोकादायक बॅक्टेरियांच्या संपर्कात येते. नखे चावल्याने नखांचे आकार कायमचेच खराब होऊ शकतात. परंतु या व्यसनामुळे स्वच्छतेशी संबंधित समस्या तुम्हाला हानी पोहोचवू शकतात. इतकंच नाही तर तुमच्या संपर्कात येणाऱ्या लोकांसाठी ही एक मोठी समस्या असल्याचे सिद्ध होते.यामुळे तुमचे दात तर खराब होतातच पण हिरड्यांवरही वाईट परिणाम होतो. यामुळे तुमच्या हिरड्यांना संसर्ग तर होतोच पण ते कमकुवतही होतात.असे केल्याने नखांच्या आजूबाजूची त्वचा कोरडी पडते आणि ती निघू लागते. हे ना स्वच्छ दिसते ना आरोग्यासाठी चांगले असते.नखे चावण्याचा थेट परिणाम पचनसंस्थेवरही होतो. ज्यामध्ये अनेक बॅक्टेरिया शरीरात प्रवेश करतात आणि पोटात जंत होण्याची समस्याही उद्भवते. लहान मुलांना याचा जास्त त्रास होतो.कितीही तणाव आणि चिंता असली तरी त्याचे व्यवस्थापन करायला शिकले पाहिजे. तणाव दूर करण्यासाठी इतरही अनेक उपाय आहेत, ज्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होत नाही.



# तुम्ही तुमचा टूथब्रश कुठे ठेवता? बाथरूममध्ये टूथब्रश ठेवणाऱ्यांना तज्ज्ञांचा इशारा

म्ही तुमचा टूथब्रश बाथरूममध्ये ठेवता का? तसे असल्यास तुम्ही कदाचित पुन्हा एकदा विचार करण्याची गरज आहे. कारण- त्यामुळे तुमच्या टूथब्रशमध्ये धुळीचे कण जमा होऊन, आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो.

कन्टेंट क्रिएटर शशांक अलशी यांनी इन्स्टाग्रामवर नुकताच एक व्हिडीओ पोस्ट केला. त्यामध्ये त्यांनी, तुमचा टूथब्रश बाथरूममध्ये ठेवल्याने तो जीवाणू आणि बुरशी यांमुळे दूषित होऊ शकतो, असे सांगितले. बाथरूमचे वातावरण, तेथील ओलावा व उबदारपणा, यामुळे तुम्हाला तुमचा टूथब्रश ठेवण्यासाठी एक सोईस्कर जागा वाटू शकते. पण हे जीवाणू आणि इतर रोगजनकांसाठी एक प्रजननक्षम केंद्र आहे, असेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले. याबाबत सविस्तर जाणून घेण्यासाठी तज्ज्ञांची मते जाणून घेतली.याबाबत द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना गुडगावच्या पारस हॉस्पिटलचे डॉ. आर. आर. दत्ता यांच्या मते, बाथरूमच्या वातावरणातील ओलावा आणि उबदारपणा टूथब्रशच्या ब्रिस्टल्सवर जीवाणूंच्या वाढीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतात.या मतावर सहमती दर्शविताना इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सचे प्रोफेसर डॉ. आशीष काकर यांनी द इंडियन एक्स्प्रेसला सांगितले, फेकल कॉलिफॉर्म्स (षशलरश्र लेश्रळषेीाी) आणि इतर रोगजनक सूक्ष्म जीवांमुळे टूथब्रश दूषित होण्याचा मोठा धोका आहे. टॉयलेट फ्लशिंगदरम्यान दमट वातावरण आणि एरोसोलायझेशन जीवाणूंची वाढ आणि प्रसार सुलभ करते. असा दूषित टूथब्रश वापरल्यास तोंडामध्ये संसर्ग होण्याची शक्यता असते. टूथब्रशच्या स्वच्छतेवर परिणाम करणारे पर्यावरणीय घटक

उच्च आर्द्रता पातळी जीवाणू आणि बुरशीजन्य प्रसार वाढवते. हवेत बारीक कणांच्या स्वरूपात असलेली (एरोसोलाइज्ड) विष्ठा आणि टॉयलेट फ्लशिंगमधून सूक्ष्म जंतूंना प्रोत्साहन देते आणि डॉ. काकर यांनी नमूद केल्याप्रमाणे, रोगजनकांना आश्रय देऊ शकणाऱ्या हवेतील बुरशीचे बीजाणू धुळीच्या कणांच्या संपर्कात येतात. डॉ. दत्ता याबाबत पुढे म्हणाले, टूथब्रशवर जीवाणूंचा प्रसार झाल्यामुळे तोंडाच्या आरोग्याच्या समस्यांचा धोका वाढतो.मग टूथब्रश नक्की कुठे ठेवावा?




तुमचा टूथब्रश बाथरूमच्या बाहेरील ठिकाणी ठेवण्याचा विचार करा. डॉ. काकर यांनी शिफारस केलेला पर्याय जसे की : स्नानगृहाच्या (बाथरूम) बाहेरील स्वच्छ, कोरडे कपाट किंवा ड्रॉवरमध्ये ब्रश ठेवा वायुजन्य दूषित पदार्थांच्या संपर्कात येण्यापासून रोखण्यासाठी टूथब्रश ठेवण्यासाठी बॉक्स वापरा; जे बाजारात सहज उपलब्ध होतात.नियंत्रित आर्द्रता आणि कमीत कमी एरोसोलाइज्ड कणांसह बेडरूम किंवा इतर राहण्याच्या ठिकाणीही ब्रश ठेवू शकता.टूथब्रशची योग्य स्वच्छता न राखल्यास होणारे दीर्घकालीन परिणाम डॉ. दत्ता यांनी नमूद केले, टूथब्रश स्वच्छता कशी राखली जाते आणि ते कुठे ठेवले जातात या पद्धतींचे तोंडाच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. टूथब्रशवर जमा झालेल्या जीवाणू आणि जंतूंमुळे हिरड्यांना आलेली सूज पीरियडॉन्टायटिस व दात किडणे तोंडात संसर्ग आणि रोगांचा धोका निर्माण होऊ शकतो.डॉ. काकर पुढे नमूद करतात, चुकीच्या ठिकाणी टूथब्रश ठेवल्यास आणि योग्य पद्धतीने स्वच्छता न केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात; ज्यामध्ये पीरियडॉन्टल रोग ओरल कॅन्डिडिॲसिस ॲस्पिरेटेड सूक्ष्म जंतूंपासून होणारा श्वसनमार्गातील संसर्ग यांचा समावेश होतो.टूथब्रशची योग्य स्वच्छता राखण्यासाठी कोणते योग्य उपाय करू शकता?डॉ. काकर प्रत्येकाला टूथब्रशच्या स्वच्छतेची योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला देतात:दर ३-४ महिन्यांनी किंवा आजारानंतर टूथब्रश बदला.टूथब्रश वापरल्यानंतर तो स्वच्छ धुवा आणि स्वच्छ, कोरड्या वातावरणात ठेवा.टूथब्रश शेअर करणे टाळा. सर्वांचे टूथब्रश एका ठिकाणी ठेवू नका.अँटीमायक्रोबियल टूथब्रश सॅनिटायझर्स किंवा क्लोरहेक्साइडिन / आवश्यक तेल माउथवॉशमध्ये भिजविण्याचा विचार करा.

टूथब्रशवरील सूक्ष्म जीवांचा भार कमी करण्यासाठी उत्कृष्ट मौखिक स्वच्छता पद्धत वापरा.बाजारात अल्ट्राव्हायोलेट लाइटचे कंटेनरदेखील उपलब्ध आहेत; जे वापरता येतील.दूषित ब्रशच्या वापरामुळे तोंडाच्या आरोग्याशी संबंधित समस्या उदभवू शकतात. टूथब्रश स्टोरेज आणि बदलण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे महत्त्वाचे आहे.तुम्हाला टूथब्रश कुठे ठेवता ही एक क्षुल्लक बाब वाटू शकते; परंतु तुमच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या बाबीकडे दुर्लक्ष करू नका. बाथरूममध्ये टूथब्रश ठेवण्याची सामान्य प्रथा टाळा आणि त्याऐवजी दूषित पदार्थांचा संपर्क कमी करणारी पर्यायी जागा निवडून, तुम्ही जीवाणूवाढीचा धोका आणि संभाव्यता लक्षणीयरीत्या कमी करू शकता.

# त्वचाविकार कधी येणार गरिबांच्या आवाक्यात ; मेडिकलला तीन वर्षांपासून ‘फ्रॅक्शनल सीओटू’ लेझर यंत्राची प्रतीक्षा

नागपूर : त्वचाविकाराचे उपचार महागडे आहेत. त्यामुळे गरिबांच्या ते आवाक्यात नाही. ही बाब लक्षात घेत त्वचाविकारावर वरदान ठरणाऱ्या ‘फ्रॅक्शनल सीओटू’ लेझर यंत्र खरेदीचा निर्णय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाने घेतला. येथील त्वचारोग विभागात हे यंत्र लावण्यात येणार होते, मात्र तीन वर्षांपूर्वी घेतलेल्या निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याची माहिती उघडकीस आली आहे.मेडिकलच्या त्वचारोग विभागात फ्रॅक्शनल सीओटू हे लेझर यंत्र खरेदीसाठी २०२१ मध्ये १५ लाख रुपये खर्चाची मंजुरी मिळाली होती. खरेदी प्रक्रियेला सुरवात झाली, नव्हेतर ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी त्वचारोग विभागातील वरिष्ठ डॉक्टरांच्या पथकाने मुंबईला भेटही दिली होती. जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेल्या निधीतून हे यंत्र खरेदी केले जाणार होते. मात्र १५ लाखांच्या निधीवर कोण्या दुसऱ्याच विभागाने डल्ला मारला. त्यामुळे त्वचारोग विभागाला हे यंत्र खरेदी करता आले नाही. यानंतर विभागाने सातत्याने पाठपुरावा केला, परंतु अद्यापही यश आलेले नाही.आता किंमत झाली २० लाख तीन वर्षांपूर्वी या यंत्रासाठी १५ लाख रुपये मंजूर झाले होते. परंतु आता या यंत्राची किंमत २० लाख रुपये झाली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळाल्यानंतर यंत्र खरेदीची प्रक्रिया पूर्ण होईल. यासाठी पुन्हा सहा महिन्याचा कालावधी लागेल असे सूतोवाच प्राप्त झाले.हे आहेत यंत्राचे फायदे नको असलेले केस काढून टाकणे  चामखीळ काढून टाकणे मोल्स काढून टाकणे  मुरुमांचे डाग नाहीसे करणे  शस्त्रक्रियेने चट्टे काढून टाकणे  त्वचेचे अनावश्यक थर काढून टाकणे  अवांछित डाग काढणे  त्वचेत सुधारणा करणे  खराब पेशी काढून टाकणे त्वचेतील कोलेजन वाढवण्यास मदत करते



# मतदान केंद्रावर मिळणार ‘ग्लुकोज-डी, ओआरएस, बीपी, शुगर’ची गोळी; मतदारांनो, बिनधास्त पडा घराबाहेर


जिल्ह्यात ‘मे हीट’चा तडाखा सुरू झाला आहे. तापमानाने ४२ अंशाचा टप्पा गाठला आहे. १३ मेस जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्यादिवशी तापमान राहिलच. मात्र, मतदारांनी काळजी करण्याचे कारण नाही. कारण जिल्हा आरोग्य विभागाने मतदान केंद्रावर ग्लुकोज डी, ओआरएससह बीपी, शुगर व इतर औषधी देण्याची व्यवस्था केली आहे. आरोग्य विभागाने यासंदर्भात नियोजन केले असून, डॉक्टरांपासून ते आशाताईंपर्यंतचे सर्वच कर्मचारी मतदारांची काळजी घेणार आहेत. जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी ३८ लाख १५ हजार ७९६ मतदार आहेत. जळगाव लोकसभेसाठी १९ लाख ९४ हजार ४६, तर रावेर लोकसभेसाठी १८ लाख २१ हजार ७५० मतदार आहेत. सध्या उन्हाचे चटके बसत असल्याने मतदार मतदानासाठी किती बाहेर पडतील, असा प्रश्न आहे. मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी प्रशासनाकडून पूर्ण प्रयत्न केले जात आहेत. गाव, शहरांमध्ये जनजागृतीही केली जात आहे.देशात पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात बहुतांश लोकसभा मतदारसंघात मतदानाचा टक्का घसरल्याचे समोर आले आहे. यासाठी काळजी घेतली जात आहे. केंद्रावरच औषधी, ओआरएस दिले जाणार आहे. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर, कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे मतदारांनी कसलीही भीती न बाळगता मतदानासाठी बाहेर पडावे, असे आवाहन आरोग्य विभाग व जिल्हा प्रशासनाने केले आहे.



‘’मतदान करण्यासाठी आलेल्या मतदारांना उन्हाचा काही त्रास जाणवला, तर आमच्याकडून ओआरएस, ग्लुकोज डी यासोबतच काही औषधी दिली जाणार आहेत. त्याचे नियोजन केले असून, संबंधित तालुका व वैद्यकीय अधिकाऱ्यांना बैठक घेऊन सूचना केल्या जातील. मतदारांनी न घाबरता केंद्रावर येऊन आपला हक्क बजवावा.’’-डॉ. सचिन भायेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्ह्यात तीन हजार ८८६ मतदान केंद्रे आहेत. प्रत्येक मतदान केंद्रांवर आशाताई, अंगणवाडीसेविका, गटप्रवर्तक यांची नियुक्ती होणार आहे. त्यांना सहकार्य व्हावे, यासाठी आरोग्यसेवक, समुदाय आरोग्याधिकारी, परिचारिका आदी असणार आहेत. या सर्वांवर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्याधिकारी नजर ठेवणार आहेत. आरोग्य विभागाने शोधून काढलेले रुग्ण, त्यांच्यासाठी मतदान केंद्रावर विविध सुविधा असणार आहेत.

# वाढत्या तापमानामुळे शरीरातील उष्णतेत होतेय वाढ, मूळव्याध अन् ॲसिडिटीसारखे आजार बळावण्याची शक्यता

वाढत्या तापमानामुळे शरीराच्या उष्णतेतही वाढ होते. यामुळे पोटात आग होणे, मूळव्याध, सिडिटी यासारखे आजार जडतात. योग्य काळजी आणि आहार घेतल्यास यावर नियंत्रण मिळवणे शक्य असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. उन्हाळ्यात ‘सन स्ट्रोक’चा धोका अधिक असतो. वाढत्या तापमानाचा परिणाम आपल्या शरीरावरही होतो. त्यामुळे पाणी कमी होऊन शरीरातील उष्णता वाढते. यासाठी जास्तीत-जास्त द्रव पदार्थांचा आहारात समावेश करावा. गोड, थंड पदार्थांचे सेवन करावे. यासह शरीरातील इलेक्ट्रोराइटचे प्रमाण योग्य ठेवणे महत्त्वाचे ठरते. शरीरातील उष्णता वाढल्यास घरात असतानाही माणसाला धोका संभवतो. यामुळे योग्य काळजी घेणे महत्त्वाचे ठरते.भरपूर पाणी पिऊन घराबाहेर पडावे.बाहेर पडताना पांढऱ्या कपड्याने कान झाकावे.लस्सी, ताक, लिंबू पाणी, पन्हे, कोकम शरबत घ्यावे.इलेक्ट्रोराइट बॅलन्स साठी लोणचे,चटणी याचे सेवन वाढवावे.वाळा, चंदन, नागरमोथा थंड पाण्यात भिजवून ते पाणी प्यावे.जिरेपूड टाकूनदेखील ताकाचे सेवन करू शकतात. तापमान वाढ रोखण्यासाठी झाडे लावणे उत्तम पर्याय. तापमानवाढीचा परिणाम शरीराच्या उष्णतेवर होत असल्याने, आहारदेखील महत्त्वाचा ठरतो. पोटात आग होणे, मूळव्याध, सिडिटी यासारखे आजार होतात. यासाठी द्रव आहाराचे सेवन वाढवावे. त्यात वेगवेगळे शरबत, पन्हे, ताक, लस्सी यांचा समावेश करू शकता.



# गाव बेचिराख झालं तरीही रस्ता नाही आजी–माजी आमदारांचे अपयश

किनवट .प्रतिनिधी. (शेख शौकत) स्वातंत्र्योत्तर काळात हजारोची वस्ती असलेल्या ममतापूर गावाला राजकारण्यांनी रस्ता व भौतिक सुविधा न दिल्याने ममतापूर गाव आज बेचिराख झाले असून परिसरातील गावकऱ्यासह शेतकऱ्यांनाही रस्ते नसल्याने आजूबाजूची गावे ही बेचीराख होण्याच्या मार्गावर आहेत माहूर तालुक्यातील अतिदुर्गम एकेकाळचा खतरनाक नक्षली विजय कुमारचे आश्रयस्थान असलेल्या भागात मौजे तांदळा इवळेश्वर हिंगणी आणि अनमाळ या चारही गावाच्या मध्य भागात एकेकाळी जंगलाला लागून ममतापूर नावाची मोठी वस्ती होती येथे अनेक नामवंत सुभेदार सह जागीरदार तसेच नागरिक मोठ्या संख्येने राहत होते पहाडाला लागून निसर्गरम्य वातावरणात असलेल्या या वस्तीत राणी महालासह इतर अनेक ऐतिहासिक वास्तू होत्या शेकडो घरांच्या वस्ती मोठी व्यापार पेठ सह बारा हनुमान मंदिर होते यापैकी आज फक्त दोन हनुमान मंदिरांची हनुमान जयंतीदिनी पूजा केली जाते गाव पहाडाला लागून वसलेले असल्याने ह्या गावात मोठी बाजारपेठ होती येथे राजे महाराजे यांच्यासाठी चैनीच्या जागा होत्या तसेच जागीरदार वतनदार यांची घरे असल्याने पंचक्रोशीतील सर्वच गावा तील नागरिक व्यापार अन्नधान्यासाठी या गावात येत होती त्या काळात सर्वच मुख्य रस्त्यांशी हे गाव जोडलेले होते देश स्वातंत्र झाल्यानंतर मात्र मुख्य रस्ते दुसरी करूनच वळविण्यात आल्याने राजकारण्यांनी आपापल्या गावातून मुख्य रस्ते बनविल्याने या गावाकडे दुर्लक्ष झाले तसेच पावसाळ्यात पाण्याने पहाडाचे पाणी या गावात येणे सुरू झाल्याने एका एकाने नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी नवीन गाव वसविणे सुरू केल्याने या गावाकडे दुर्लक्ष झाले आज या





गावाच्या अवशेषा पोटी हनुमान मंदिरासह पक्या स्वरूपाचे राणी महाल शेवटच्या घटका मोजत उभे असून या गावात जाणाऱ्या रस्त्याने नाल्याचे स्वरूप घेतल्याने पहाडाचे सर्व पाणी या रस्त्यावरून वाहते त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनाही आपापल्या शेतात जाण्यासाठी रस्ता नसल्याने शेती पडीक पडून गाव पूर्णपणे बेचिराख झालेले आहे ममतापूर गावापासून दोन किमी अंतरावर मौजे तांदळा गावात ममतापूर गावातील अर्ध्या अधिक नागरिकांनी आसरा घेतला असून घराजवळ असलेली शेती दोन किलो मीटरवर गेली परंतु रस्ता नसल्याने अर्धी अधिक शेती पडीक पडली असून या गावाबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध असल्याने शेतीत जागली साठी कुणीही जात नसल्याने जंगली जनावरे उभ्या पिकावर आरामात ताव मारत असल्याने दे या परिसरातील शेती ही पडीक पडण्याच्या मार्गावर आहे गाव उध्वस्त होण्यामागे या गावाच्या अनेक महामारी दंतकथा शापित दंतकथा प्रसिद्ध असून या गावातून तांदळा ममतापुर अनमाळ तांदळा ममतापूर हिंगणी तसेच अनमाळ ममतापूर ते इंगळेश्वर कुपटी फुलसावंगी असा मोठा मार्ग होता परंतु या मार्गाकडे दुर्लक्ष झाल्याने तांदळा ते माहूर मार्ग अनमाळ जाण्यासाठी जवळपास ४० किमी अंतर पार करावे लागते तेच तांदळा ते ममतापूर मार्ग अनमाळ रस्ता बनविल्यास फक्त चार किमी अंतर असल्याने फक्त चार किमी रस्ता न बनविल्याने आज ममतापूर गाव बेचिराख झाले आहे या भागाला अनेक कर्तबगार खासदार लाभले तसेच पंधरा वर्षे माजी आमदार प्रदीप नाईक यांनी सत्ता भोगली तर अडीच हजार कोटी रुपयाची विकास कामे केल्याचा दिंडोरा पिटणारे विद्यमान आमदार भीमराव केराम यांनी सुद्धा ९०० मीटर रस्त्या साठी तीन कोटी रुपये देऊन भारतातील सर्वात महान रस्ता तालुक्यात बनविण्याचा विश्वविक्रम केला परंतु या चार किमीच्या रस्त्याकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिक आजी–माजी आमदार यांचे सह आजी–माजी जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्याच्या नावाने बोटे मोडत असून चार किमी रस्ता न बनविल्याने गाव बेचिराख होऊनही ४० किलोमीटरचा फेरा मारून अनमाळ येथे जावे लागत असल्याची दुर्दैवी पाळी तांदळा इवळेश्वर हिंगणी वासियावर आलेली आहे मोदी सरकार मधील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देशात मोठमोठे रस्ते बनवून विक्रम केला असला तरी माहूर तालुक्यातील अनेक खेडेपाडे आजही देशाचा मुख्य कणा असलेला रस्त्यापासून आजही वंचित आहेत

## अवाहन.... मतदाराला.

हे सुजाण मतदार बांधवा, कर्तव्याप्रती जागा हो करण्या
बळकट लोकशाहीला, मत प्रक्रीयेचा धागा हो
तुझ्याच हाती देशहीत, अन तुझ्याच हाती निर्णयही
तुझ्या मताने निवडून येईल, तुझ्या मताचे सरकारही
दिव्यांग असला वृद्ध असला, म्हणूनी काम बसणार घरी
तुझीया सोबत घरची सारी, गावकरी मतदान करी
एका मताने काय फरक हा, नकार गाणे गाऊ नको
दिव्यांग बंधू ही मागे नाही, तूही मागे राहू नको
आपण लोकशाहीचा उत्सव आपण सारे मिळूनी करु
साजरा जाऊच सारे मतकेंद्रावर, उधाण येई जसे सागरा
एमा दिव्यांग आणि वृद्धांनाही, प्रशासनाचे भवाहन आहे
संभर टक्के मतदानाचे, यावर्षी प्रावधान भारे
दैनिक काम हे दरदिवसाचे, म्हणून मतदान टाकूनको
मत अधिकार हक्क आपले, कर्तव्यातून पळू नको ।।धा
मिठ मिरचीच्या दराएवढी, किमत त्याची करु नको
मौल्यवान है मत तुझे रे, उगाच मागे सक नको
करण्या मतदान नवतरुणांना, ओमाने प्रेरीत करु नवीन
अठरा वर्षावरचे, नव मतदार प्रवृत्त करु ।।धा
महिला भगीनी अन युवतींनो, सर्व कामातून वेळ काढा
करण्या मुबलक मतदान हे, मोठ्या प्रमाणात बाहेर पड़ा
देशाचे भवितव्य साधण्या, आज इतिहास घडवूया
मतदान हे कुरुनी विक्रमी, टक्क्याचा उच्चांक वाढवूया
********
शहाजी बनसोडे
कला शिक्षक

# मांडवी वनपरिक्षेत्रातील कृत्रिम पानवठे भर उन्हाळ्यातही कोरडेक

किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) मांडवी वनपरिक्षेत्रासह किनवट तालुक्यात उन्हाचा पारा वाढला असून यातच वन विभागाच्या भोंगळ कारभाराने कळस गाठला आहे. उन्हाळ्याचे तीन महिने संपले तरीही मांडवी वनपरिक्षेत्रातील कृत्रिम तयार केलेले पानवठे अजूनही कोरडेठाक असल्याने पक्षी फडफड करीत आहेत तर वन्यप्राणी यांनी गावाकडे मोर्चा वळविला आहे. उन्हाळ्यामध्ये जंगलातील वन्य प्राणी, पशुपक्ष्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनविभागाने उनकेश्वर, सारखणी, मांडवी, पिंपळगाव या परिमंडळात अल्प प्रमाणात कृत्रिम सिमेंट कॉंक्रेट चे पानवठे तयार करण्यात आले आहे. तसेच यावर्षी मातीचा खड्डा तयार करून त्यात पॉलिथिन अंथरूण पानवटे तयार करण्याचे काम सुरू आहे. जे पूर्वी सिमेंट कॉंक्रीटचे पानवठे तयार केलेले आहेत त्या पानवठ्यात उन्हाळ्याचे तीन महिने संपत आले असताना देखील टॅंकरद्वारे त्यामध्ये पाणी सोडलेले नाही मात्र या पाणवठ्यात टॅंकरद्वारे पाणी टाकल्याचे कागदोपत्री दाखवून वाउचर तयार करून बिले उचलण्याच्या तयारीत वनाधिकारी असल्याचे दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मनम ानी कारभार मुळे गेल्या महिन्यात वनपरिक्षेत्र मांडवी जंगलात पंधरा दिवस



आगीच्या तांडव होता.या वन्य प्राणी व पक्षांना बसत आहे. तसेच त्यांचे कर्मचाऱ्यावरील नियंत्रण नसल्याने कर्तव्यदक्षपणे वनरक्षक वनपाल आपली जबाबदारी पार पाडत नसल्याचे यावरून दिसून येते. या कृत्रिम पानवठ्यात आज तब्बल तीन महिन्यापासून वन विभागाने पाणी टाकले नसल्याने पक्षी तडफडत आहेत तर पाण्याच्या शोधात वन्यप्राणी गाव व शेतशिवाराकडे भटकंती करीत आहेत. त्यामुळे हिंस्र प्राण्याकडून दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा याकडे नांदेडचे उपवासंरक्षक वाभळे यांनीच लक्ष देण्याची गरज आहे.

# भाजपला १५० जागाही मिळणार नाहीत

रतलाम : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा भाजपाने निवडणूक जिंकली तर ते संविधान बदलतील असे म्हटले आहे. मध्य प्रदेशातील रतलाम येथे निवडणूक रॅलीला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, भाजपा नेत्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे, निवडणुकीत जिंकलो तर संविधान बदलू, त्यामुळेच त्यांनी ४०० जागांचा नारा दिला होता. भाजपा–एनडीएला १५० जागाही मिळणार नसल्याचा दावा राहुल यांनी केला. ही निवडणूक देशाची लोकशाही आणि संविधान वाचवण्याची निवडणूक असल्याचे राहुल म्हणाले. एका बाजूला नरेंद्र मोदी आणि आरएसएस आहेत, जे संविधान नष्ट करू पाहत आहेत. दुसरीकडे, काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडी आहे, जी संविधान वाचवण्यात मग्न आहे. भाजपच्या लोकांना संविधान रद्द करून गरीब, दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांचे आरक्षण हिसकावून घ्यायचे आहे, मात्र आम्ही आरक्षण कधीच संपू देणार नाही, आरक्षणावरील ५० टक्के मर्यादाही आम्ही हटवणार आहोत



असे राहुल गांधी यांनी सांगितले आहे. तुमचे सर्व अधिकार काढण्याचा कट राहुल गांधी यांनी हातात संविधान घेऊन लोकांना सांगितले की पंतप्रधान मोदींना हे (संविधान) काढून टाकायचे आहे आणि त्यांना फक्त राज्य करायचे आहे. त्यांना तुमचे सर्व अधिकार काढून घ्यायचे आहेत. हे त्यांचे ध्येय आहे आणि आम्ही थांबवण्याचा प्रयत्न करत आहोत. आदिवासी, मागासवर्गीय आणि दलितांना जे काही अधिकार मिळाले ते याचे (संविधान) योगदान आहे.हवे तितके आरक्षण देऊ भाजपाच्या नेत्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, सत्तेत आल्यास ते हे बाजूला ठेवतील. त्यामुळेच त्यांनी ४०० जागांचा नारा दिला आहे. त्यांना १५० जागाही मिळणार नाहीत. त्यांचे नेते सांगत आहेत. ते आरक्षण काढून घेतील, आम्ही दलित, मागासवर्गीय आणि गरिबांना जितके आरक्षण हवंय ते देऊ असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

# मीराताई आंबेडकर यांचा ८९ वा जन्मदिनानिमित्त समता सैनिक दलाकडून मानवंदना व पेढे वाटून साजरा

लातूर :– भारतीय बौद्ध महासभेच्या राष्ट्रीय संरक्षक तथा बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सून महाउपासिका आद. मीराताई आंबेडकर ५ मे २०२४ रोजी ८९ वा जन्मदिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क लातूर येथे समता सैनिक दलाकडून मानवंदना व पेढे वाटून साजरा करण्यात आला. सुरुवातीला बोधी सत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून धूप व दिपानी अभिवादन करून त्रिसरण पंचशील घेण्यात आले. यावेळी समता फोर्स (कमांडो ट्रेनिंग) साठी निवड झालेले सम्राट लामतुरे अशोक, लामतुरे प्रेम, ससाणे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच समता सैनिक दलामध्ये महिला सैनिक छायाताई माने, लताताई बनसोडे, शीलाताई जोगदंडे, शिवानी सूर्यवंशी, साक्षी सूर्यवंशी



व नवनिर्वाचित महिला जिल्हा कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला यावेळी महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे, सरचिटणीस वंदनाताई कांबळे, कोषाध्यक्ष मायाताई कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष केंद्रीय शिक्षिका कविताताई कांबळे, जिल्हा हिशोब तपासणी प्रेमनाथ कांबळे व जिल्हा संघटक गौतम बनसोडे यांनी शुभेच्छा पर आपले मनोगत व्यक्त केले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष संरक्षण विभाग मेजर जनरल राजाराम साबळे, जिल्हा उपाध्यक्ष केंद्रीय शिक्षिका मंगलताई सुरवसे, डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, कंपनी कमांडर बौद्धाचार्य नानासाहेब आवाड, जिल्हा सचिव आनंद डोणेराव, जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे, जिल्हा सचिव रवी कांबळे, जिल्हा संघटक अर्जुन कांबळे, जिल्हा संघटक सुकुमार ताई कांबळे, जिल्हा सचिव कांताताई सरवदे, देवराव जोगदंडे, राजाभाऊ उबाळे, दयानंद वाडीकर, ड. यशवंत चव्हाण तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे यांनी केले तर आभार जिल्हा संघटक छायाताई उबाळे यांनी मानले कार्यक्रमाची सांगता सरणतय या धम्मपालन गाथेने करण्यात आली.

# बुथ प्रमुखांनी सजग रहावे : ना . संजय बनसोडे

उदगीर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाला गेल्या दहा वर्षांत मोठी गती दिली आहे. ही विकासाची गती कायम ठेवत देशाची अर्थव्यवस्था जगात प्रथम क्रमांकावर आणण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व महायुतीच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी कसलेही हेवेदावे न ठेवता सजग राहून बुथचे काम करावे, असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. उदगीर येथे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, रिपाई आठवले गट, कवाडे गट, मनसे, रासप, जनसुराज्य पक्ष, महायुतीचे लातूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व बुथ प्रमुख यांच्यासोबत आयोजित संवाद बैठकीत ना. संजय बनसोडे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस समीर शेख, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानी,



कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी नगरसेवक फैजुखान पठाण, फैयाज शेख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बुथप्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना ना. बनसोडे म्हणाले की, लोकसभेची निवडणूक ही देशाचा नेता निवडणारी आहे. नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत ही सर्व भारतीयांची इच्छा आहे. त्यामुळे देशात पुन्हा मोदी सरकार सत्तेत येईल, असा विश्वास ना. बनसोडे यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीतील पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. प्रविण भोळे यांनी केले.

# गंजगोलाईत लोकसभेचे अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांची अनोखी सभा. सभेला प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व प्रेक्षक म्हणून खुर्चीवर विटा, दगड.

लातूर / प्रतिनिधी :– लातूर लोकसभेचे अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांनी आज रविवार दि. ५ मे २०२४ रोजी लातूर शहरातील प्रमुख मार्केट असलेल्या मस्जिद रोड, गंजगोलाईत आज दुपारी साडेतीन ते चारच्या दरम्यान एक अनोखी अशी अगळी वेगळीच जाहीर सभा झाली. या जाहीर सभेस अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजर झालेल्या व्यासपीठावरील खुर्चीतील महापुरुषांना व प्रेक्षक म्हणून खुर्चीवर ठेवलेल्या विटा, दगडे या मूक नागरिकांना या निवडणूक विषयी मार्गदर्शन केले व प्रचाराचा आज ५:३० मिनिटाला शेवट केला असल्याने या अनोख्या सभेला पाहण्यासाठी नागरिकांनी गंजगोलाईत मोठी गर्दी केली होती. यावेळी लातूर जिल्ह्यातील २५ नंबर ईव्हीएम मशीन वरचे



अपक्ष उमेदवार ज्यांचे चिन्ह प्रेशर कुकर असून यांची आज



सभा मज्जित रोड गंजगोलाई या ठिकाणी संपन्न झाली या सभेस प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व या सभेत नागरिक म्हणून विटा, दगड ठेवण्यात आले होते. आज रविवार असल्याने लातूर जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी खूप मोठ्या सभा झाल्या परंतु मस्जिद रोडवरील गंजगोलाई या ठिकाणी अपक्ष उमेदवार रघुनाथ बनसोडे यांचे चिन्ह प्रेशर कुकर घेऊन त्यांची लातूरातील आगळीवेगळीच सभा यात प्रमुख पाहुणे म्हणून सर्व महापुरुष व प्रेक्षक म्हणून दगड, विटाची सभा जी की कोठेतरी रेकॉर्डवर नोंद होण्यासारखी सभा पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी येथे मार्केटमध्ये खरेदी करण्यासाठी आलेले नागरिक आवाज ऐकून या ठिकाणी येत नागरिक मोठ्या संख्येने उभे राहून भाषण ऐकत व पहात होते त्याच बरोबर महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी यांचीही संख्या खूप मोठी होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE